**MHNS160015442023**

## नियमीत दिवाणी दावा क्र. २२९/२०२३ मध्ये निशाणी २३ खाली आदेश

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांना त्यांचे म्हणणे व कैफियत देण्यास झालेल्या विलंबाची माफी होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुद्ध वाटप, तुटक कब्जा, उत्पन्नाचे नुकसान व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने पुढे कथन केले आहे की, त्यांना कैफियत व लेखी जबाब दाखल करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे वेळेत न मिळाल्यामुळे त्यांना कैफियत व म्हणणे मुदतीमध्ये दाखल करता आले नाही. त्यामुळे त्यांना लेखी कैफियत व जबाब दाखल करण्यास ११ महिने ०८ दिवसांचा विलंब झालेला आहे. तो माफ होऊन प्रतिवादींची कैफियत व म्हणणे अभिपटलावर दाखल करुन घेण्याची विनंती प्रतिवादींनी सदर अर्जाद्वारे केली आहे.

०३. वादींनी सदर अर्जाला त्यांचे म्हणणे दिले असून अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत व सदर प्रतिवादीला जास्तीत जास्त खर्च ठेवून अर्ज मंजूर करण्याची मागणी केलेली आहे.

०४. प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिपटलाचे अवलोकन करता असे दिसून येते की प्रतिवादींना दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर पुरेशी संधी देवूनही त्यांनी वेळेत कैफियत व त्यांचे म्हणणे न्यायालयात सादर केले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध विनाकैफियत व विना जबाबचा आदेश पारित करण्यात आला. मात्र त्यानंतर साधारणतः११ महिने ०८ दिवसांच्या विलंबाने प्रतिवादींनी सदरचा विलंब माफीचा अर्ज दाखल दाखल केल्याचे दिसून येते. जरी प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्यास ११ महिने ०८ दिवसांचा विलंब झालेला असला तरी त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे नैसर्गिक न्याय तत्वाला धरुन आहे. प्रतिवादींची कैफियत अभिपटलावर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याच्या योग्य

निर्णयासाठी ते उपयुक्त ठरणार आहे. प्रतिवादींची कैफियत व लेखी जबाब अभिपटलावर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींमुळे प्रस्तुतकामी जो विलंब झाला त्याची भरपाई प्रतिवादींवर दंड बसवून करता येईल. सबब, यासर्व बाबींचा विचार करता नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– आदेश –**

१. प्रतिवादी १, २ व ५ यांनी वादीला रक्कम रुपये ३००/– देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा प्रतिवादींचा चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी १, २ व ५ यांनी वादीला दंडात्मक रक्कम रुपये ३००/– दिल्यावरच प्रतिवादींची कैफियत व लेखी बयाण अभिपटलावर घेण्यात येईल याची प्रतिवादींनी नोंद घ्यावी.

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.10.10 17:50:51 +0530

दिनांक :– १०.०९.२०२५
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.